आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ जुलै २०२४ - बुधवार

लोकसभेने आर्थिक वर्ष २०२४-२५चा अर्थसंकल्प चर्चेसाठी घेतला आहे. यासोबतच जम्मू-काश्मीरच्या अर्थसंकल्पावरही सभागृहात चर्चा होणार आहे. या चर्चेची सुरुवात करताना काँग्रेसच्या खासदार कुमारी सेल्जा यांनी देशात दिवसेंदिवस वाढत असलेल्या वाढत्या बेरोजगारीचा मुद्दा उपस्थित केला.

**<><><><><>**

**केंद्रीय अर्थसंकल्पात** निधी वाटप करताना काही राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी फेटाळून लावला. विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांना काहीही दिलं नाही असा भ्रम काँग्रेस पसरवत आहे. अर्थसंकल्पाच्या भाषणावेळी प्रत्येक राज्याचं नाव घेतलं नाही म्हणजे त्या राज्यांना काहीच दिलं नाही असं नाही, असं सीतारामण यांनी राज्यसभेत शून्य प्रहरातल्या चर्चेवेळी सांगितलं. लेखानुदान आणि कालच्या अर्थसंकल्पादरम्यान महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधल्या अनेक विकास प्रकल्पांना मंजुरी दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**तत्पूर्वी केंद्रीय** अर्थसंकल्पात निधी वाटपात भेदभाव करण्यात आल्याचा आरोप करत इंडिया आघाडीने आज संसद भवनाच्या आवारात निदर्शने केली. सर्व राज्यांना समान न्याय द्यायला हवा अशी मागणी विरोधी पक्षांनी केली. केंद्रीय अर्थसंकल्पात निधीचं वाटप करताना विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांवर अन्याय झाल्याची टीका काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत केली.

**लोकसभेतही विरोधी** पक्षांनी याच मुद्द्यावरून सभात्याग केला. लोकसभेचं कामकाज सुरू होताच इंडिया आघाडीच्या सदस्यांनी निदर्शने केली.

**<><><><><>**

यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी भरघोस तरतूद केली असून राज्यातल्या अनेक रेल्वे प्रकल्पांची कामं हाती घेतल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी दरवर्षी सरासरी १ हजार १७१ कोटी रुपयांची तरतूद होत होती. गेल्यावर्षी ही तरतूद साडे १३ हजार कोटींहून अधिक होती, असं ते म्हणाले.

<><><><><>

कर्करोगावर उपयुक्त औषधांच्या आयात शुल्कात सूट देण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी काल केंद्रीय अर्थसंकल्प मांडताना केली. यात स्तनांच्या कर्करोगासाठी, फुफ्फुसाच्या कर्करोगासाठी आणि पित्तनलिकेच्या कर्करोगासाठी असलेल्या औषधांचा समावेश आहे. देशातल्या २७ लाख कर्करुग्णांना याचा लाभ मिळणार असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><><><>

सोनं आणि चांदीवरचं आयात शुल्क अर्थसंकल्पात कमी केल्यानंतर या धातूंच्या दरांमध्ये होणारी घसरण आजही सुरूच आहे. २४ कॅरेट सोनं कालपासून तोळ्यामागे सुमारे ३ हजार ४०० रुपये आणि २२ कॅरेट सोनं तोळ्यामागे ३ हजार ३०० रुपयांनी स्वस्त झालं आहे. सध्या २४ कॅरेट सोन्याचे दर ६९ हजार रुपयांच्या पलीकडे आणि २२ कॅरेट सोन्याचे दर ६७ हजार ५०० रुपयांच्या पलीकडे आहेत. चांदी कालपासून सुमारे २ हजार ६०० रुपयांनी स्वस्त झाली आहे. सध्या चांदीचा दर किलोमागे सुमारे ८५ हजार रुपये आहे.

<><><><><>

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मध्यरात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याचं खासगी वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. मुंबईत काल संघाचे विविध पदाधिकारी आणि भाजपाची बैठक झाली. त्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते, असंही यात म्हटलंय.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आपलं उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. जालनाच्या आंतरवाली सराटी इथं गेल्या पाच दिवसांपासून त्यांचं आमरण उपोषण सुरू आहे. सरकारचा जीव ज्या खुर्चीत अडकला आहे, ती खुर्ची मिळवण्याच्या तयारीला आम्ही लागणार आहोत, असं जरांगे यांनी वार्ताहरांशी बोलताना म्हणाले.

<><><><><>

महसूल खात्याच्या विविध विभागातल्या कर्मचाऱ्यांचा संप महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भेटीनंतर काल मागे घेण्यात आला. यावेळी मंत्री विखे पाटील यांनी कामगारांना संप थांबवण्याचं आवाहन करून वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीद्वारे तोडगा काढावा, असे निर्देश दिले.

<><><><><>

नेपाळमधल्या काठमांडू इथल्या विमानतळावर आज सकाळी एका खासगी विमान कंपनीच्या विमानाचा अपघात झाला. यात १८ जणांचा मृत्यू झाला असून वैमानिकाला वाचवण्यात यश आलं आहे, अशी माहिती काठमांडूच्या वरिष्ठ पोलीस अधिक्षकांनी दिली.

**<><><><><>**

हवामान खात्यानं येत्या २४ तासांकरता पालघर, रायगड, पुणे आणि सातारा जिल्ह्याला रेड अलर्ट तर मुंबईसह ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि कोल्हापूर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यातल्या पांढरकवडा इथली खुनी नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. त्यामुळं मांडवी आणि पाटणबोरी या गावांना जोडणारा पूल पाण्याखाली गेला आहे.

**चंद्रपूर** जिल्ह्यात अनेक नदी-नाल्यांना पूर आला आहे. काही ठिकाणी नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यातल्या पर्लकोटा नदीला पुन्हा पूर आल्यामुळं भामरागड-आलापल्ली मार्गावरची वाहतूक ठप्प झाली आहे. **रत्नागिरी** जिल्ह्यात आजही मुसळधार पाऊस सुरु आहे. जिल्ह्यातली जगबुडी नदी इशारा पातळी ओलांडून वाहत आहे.

//<><><><><>//